(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# कोरोना विषाणू आणि जागतिक परिणाम

प्रा. नितीन माणिकराव बिहाडे

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे , जिल्हा अमरावती Mo.no.9767515840

……………………………………………………………………………………………………

**सारांश :**

आज संपूर्ण जग विषाणूच्या संकटाशी लढा देत आहे. त्याचे परिणाम आरोग्य आर्थिक राजकीय सामाजिक सर्व स्तरावर झालेले दिसतात कुठलाही एक परिणाम नसून अनेक परिणामांना आज जग सामोरे जात आहे. आज जगामध्ये बलाढ्य समजली जाणारी अमेरिका फ्रान्स इंग्लंड इटली जर्मनी आणि चीन सुद्धा अतिशय प्रभावीतअसून यांची अर्थव्यवस्थेवर खूप मोठा परिणाम होणार आहे. अगदी एखाद्या महायुद्धा प्रमाणे आर्थिक आणि वित्तहानी झालेली असेल. जगामध्ये बेरोजगारीची समस्या यामुळे खूप मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली आहे. अनेक देशांमधून आंतरराष्ट्रीय कंपन्या माघार घेत आहेत फार मोठा आर्थिक तोटा सहन त्यांना करावा लागत आहे. आंतरराष्ट्रीय आवागमन देखील पूर्णतः अगदी अनिश्चित कालावधी करता स्थगित झालेले आहे. आयात-निर्यातीच्या विषय फारच वेगळा आहे कुठल्याही देशांमधून आज आयात-निर्यात अगदी नसल्याचे स्थितीमध्ये येऊन बसलेली आहे. यामधून अनेक देशांत करिता अत्यावश्यक असलेले क्रूड ऑइल म्हणजे खनिज तेल देखील अत्यंत नसल्याच्या स्थितीमध्ये आज त्याला मागणी होत आहे. हे सर्व परिणाम कोरला विषाणूची असलेले पहावयास मिळते आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण संबंध देखील या विषाणूमुळे धोक्यात आल्याचे दिसते आज जगाचा थोडाही विश्वास असलेला दिसत नाही.ज्या राष्ट्रांना याची खूप झड पोहोचलेली आहे, ते आज उघडपणे चीनच्या या षडयंत्र विषयी बोलत आहेत. निश्चितच कोरोनाविषाणूचे मोठे संकट संपल्यानंतर जगाची स्थिती आणखी वेगळी होऊ शकते का याची देखील चर्चाहोणे गरजेचे असेल एकूणच म्हणेजेआज जगाची संपूर्ण अर्थव्यवस्था व्यापलेली असल्यामुळे बेरोजगारी ही समस्या खूप मोठी असेल. आणि म्हणूनच या जगाने व्यापलेल्या या महामारी च्या अशा परिणामांना सामोरे जाताना सर्व जगाला एक व्हावे लागेल. तरच या विषाणूमुळे निर्माण निर्माण झालेल्या जागतिक स्थितीचा सामना करता येईल.

**प्रस्तावना :**

दुसऱ्या महायुद्धानंतर जगामधील सर्वात मोठे संकट शीत युद्धहोते.या मधून कधी तिसऱ्या महायुद्धाची उत्पत्ती होईल सांगता येत नव्हते मात्र तिसरे युद्ध झाले नाही, परंतु आज जग तिसऱ्या महायुद्धाच्या सारख्यापरिस्थितीतुन जात आहे. कोरोना महामारी आज संपूर्ण जग व्यापून टाकलेले आहे. 250000 पेक्षा अधिक बळी आजपर्यंत या आजाराने घेतलेले दिसतात.जगामधिल राष्ट्र आज उद्या संकटामध्ये सापडलेले आहेत.युरोपीय देश यामध्ये प्रामुख्याने यापैकी सापडलेले दिसतात. जगाचे नेतृत्व करू इच्छिणारी अमेरिका आज पूर्णतः बंद झाल्याचे दिसते ,आणि आपल्या प्रगतीच्या जोरावर जगाला दिशा देण्याचे कार्य करणाऱ्या युरोपीय व्यवस्था देखील आज यामध्ये सापडल्या आहेत. जवळपास चाळीस लाख लोकांना जगामध्ये याची लागण झालेली दिसते.भारतही यामध्ये सापडल्या गेलेला आहे म्हणून ज्या समस्येने आज संपूर्ण जग व्यापलेले असताना या समस्येचे परिणाम निश्चितच जागतिक स्तरावर आणि खूप खोल गेलेले असतील याकरिता त्याजागतिक परिणामांचा अभ्यास करणे आणि शोध घेणे हे एक संशोधक म्हणून निश्चितच महत्त्वपूर्ण कार्य असेल म्हणून कोरोना विषाणूचा जागतिक परिणामांचा अभ्यास केला असता काही ठळक परिणाम समोर येताना दिसतात. ते पुढीलप्रमाणे,

कोरोनासमस्येचे जागतिक परिणाम

**आर्थिक मंदीचे संकट** : कुठला विषाणूमुळे आज जगावर सर्वात मोठा परिणाम झालेला आहे तो म्हणजे आर्थिक जागतिक येणारी मंदी होय.आज संपूर्ण जग लोक डाऊन आहे.यामुळे सर्व उत्पन्न थांबलेले आहे, परिणामी संपूर्ण जगाची आर्थिक घडी आज विस्कटली दिसते. जागतिक बँकेच्या निष्कर्षानुसार कमीत कमी एक ट्रिलियन डॉलरचे नुकसान आज जगाला झालेले आहे. 2019-20 मध्ये जागतिक अर्थव्यवस्थेची वाढ 3.3 पर्सेंट होती 21 मध्ये ती 3.4 अपेक्षित होती मात्र आता ही वाढ 2019 20 मध्ये 0.1 2021 मध्ये 02 अशी कमी झालेली दिसेल यामुळे आज सर्व प्रकारच्या अर्थव्यवस्था मागे आल्या दिसतील विशेषतासंपूर्ण जगावर राज्य करणाऱ्या अमेरिकेची ही स्थिती यापेक्षा वेगळी नसेल. आणि हे परिणाम किमान दोन वर्षापर्यंत तरी दिसतील.

**रोजगाराची समस्या** :पुन्हा विशाल जागतिक परिणाम म्हणजे रोजगाराची समस्या होय. सर्व जागतिक कंपन्यांनी उत्पादन थांबल्यामुळे आज अनेक कंपन्यांमध्ये काम करणारे कामगार बेकार झाले आहेत अमेरिकेमधील काही कामगारांची स्थिती एवढी भयानक आहे का त्यांना त्यांचे घर भाडे चुकविणे देखील शक्य होताना दिसत नाही. कंपन्यांनी आपले कामगार कमी केल्याचे दिसते आणि हा परिणाम एक वर्षाकरतानाहीतर अनेक दिवस हा परिणाम चालणार आहे.आज अनेक दिशांनी आपल्या देशामध्ये येण्याकरता नागरिकांना बंदी घातलेली आहे.सहाजिकच विविध पदावर अनेक देशांमधून काम करणाऱ्या लोकांना आता आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करता येणार नाही.यामुळे फार मोठ्या प्रमाणात रोजगाराची संकट आणि बेरोजगारीची समस्या जगापुढे उभी असलेली दिसेल.

**चीनवर विश्वास** :चीन आधीच पोलादी पडदा असलेला देश आजपर्यंत कधीही चीनमध्ये काय सुरू आहे याची माहिती जगाला मिळत नव्हती. आणि झाले तसेच त्याची समस्या चीनमध्ये उहान प्रांतांमध्ये निर्माण झाल्यानंतर जगात याची पुसटशीही कल्पना नव्हती हा व्हायरस कोठे तयार झाला.कशा प्रकारे तिची उत्पत्ती झाली याविषयी संपूर्ण जगामध्ये आज साशंकता आहे मात्र निश्चितच चीन काहीतरी लपवत आहे या निर्णयाप्रत आज जग आलेले दिसते, बहुतेक देशांचा आज चीनवर विश्वास राहिलेला नाही लागन झालेल्यांची संख्या आणि मृत्यूची संख्या चिनने आजपर्यंत लपविली यामुळे अधिकच अविश्वासवाढलेला दिसतो.विषानू कसा निर्माण झाला तो मानवामध्ये कसा आला याचा शोध घेण्याचा प्रयत्न आज जग करत आहे. मानवनिर्मित आहे ते नैसर्गिक आहे याविषयी चीनवर आज फार मोठे संशयाचेढग दाटून आलेले आहेत. आणि हा खूप मोठा परिणाम म्हणावा लागेल अमेरिका जर्मनी इटली आज खुल्लमखुल्ला चीनने आर्थिक नुकसानकेल अशी भाषा करू लागले आहेत. याचे परिणाम निश्चितच गंभीर स्वरूपाचे असू शकतील.

**आंतरराष्ट्रीय व्यापार कमी होणार :**हासुद्धा कोरोना विषाणूचा जागतिक परिणाम म्हणावा लागेल आज संपूर्ण जग थांबलेले असताना निश्चितच व्यापारही तेवढ्या प्रमाणात कमी झालेला दिसतो. याचा परिणाम आर्थिक स्थितीवर खूप मोठ्या प्रमाणात झाला. अगदी दोन आणि चार महिन्याच्या बंद मध्ये खूप मोठा परिणाम समोर आलेला आहे. आणखी किती दिवस जागतिक व्यापार बंद राहील याची शाश्वती देता येत नाही मात्र निश्चितच आंतरराष्ट्रीय व्यापारावर महायुद्धानंतर फार मोठ्या प्रमाणात कुठलाही निर्बंध नसताना कोरोना विषाणूने नैसर्गिक निबंध घातले असेच म्हणावे लागेल.

**पर्यटन क्षेत्र धोक्यात येणार :**कोर विषाणूचा सर्वात अधिक परिणाम हा परिणाम क्षेत्रावर झालेला दिसतो अगदी कुठल्याही देशांतर्गत पर्यटन असेल किंवा आंतरराष्ट्रीय पर्यटन असेल पूर्णतः बंद झालेले आहे ज्या भागाचे ज्या देशाची संपूर्ण अर्थव्यवस्था ही पर्यटनावर असलेली असेल तेच तर अतिशय गंभीर परिणाम या क्षेत्रावर झालेले दिसतात आणि हे परिणाम केवळ थांबून चालणार नाही तर त्या देशाची संपूर्ण आर्थिक स्थिती डबघाईस आल्याशिवाय राहत नाही युरोपीय देश चीन अमेरिका संपूर्ण जग आज पर्यटन निवृत्त झालेले आहे असे म्हणावे लागेल.

**गुंतवणुकीवर परिणाम होणार :**कोरोना विषाणूचा आणखी एक मोठा परिणाम म्हणजे गुंतवणूक अनेक देशांची चिंता वाढवणारी असेल जे देश आज विषाणूच्या विळख्यात सापडलेले आहेत त्या देशांमधून आज अनेक मोठ्या कंपन्या बाहेर पडण्याच्या मार्गावर आहेत. चीनमधून तर अनेक देशांनी आपले कंपन्या परत बोलावलेल्या आहेत जपानने तर कंपन्यांना आर्थिक नुकसान देखील भरपाई करून देण्याचे आश्वासन दिलेले आहेत. सहाजिकच नवीन गुंतवणूक करण्याकरिता कंपन्या नवीन देशांची वाट धरतील यामुळे काही देशांमधील गुंतवणूक कमी होणार आणि ज्या देशांत मध्ये विषाणूचा परिणाम कमी झालेला आहे अशा देशांना फार मोठ्या आर्थिक विकासाच्या संधी आज स्वतःहून चालत आलेल्या असतील आणि यामध्ये भारतासारख्या मोठ्या विशाल देशाचा देखील समावेश असेल.

**भारताची स्थिती सुधारेल :**कोरोना विषाणूचा सामना भारताने खूप मोठ्या या पद्धतीने करून दिला. आज संपूर्ण जग भारताच्या या प्रयत्नामुळे भारती प्रधानमंत्री आणि एकूणच या व्यवस्थेच्या प्रेमात पडल्याचे दिसते. अगदी अमेरिका डब्ल्यू एचओ भारताच्या प्रयत्नांची मोठी प्रशंसा केलेली आहे. आज जग भारताकडे फार मोठा आशेने उमेदीने पाहत आहे. आणि लढ्याचे नेतृत्व करावं असं सर्वांना वाटत आहे एवढी मोठी इमेज भारताची आज आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेली आहे. एकशे पस्तीस कोटी पेक्षा अधिक लोकसंख्या असलेला देशात अतिशय कमी प्रमाणात झालेला आहे आणि हे संकट उत्तमरित्या हाताळल्याबद्दल संपूर्ण जगाने आज भारताचेकौतुक केल्याचे दिसते म्हणूनच पुढील काळामध्ये भारत जगाला दिशा देण्याचे कार्य करेल आणि एक वेगळा जागतिक नेतृत्व करण्याची क्षमता भारतामध्ये आहे हे जगाला दिसेल.

**आयात-निर्यात परिणाम :**कोरोनाविषाणूचा आणखी एक जागतिक परिणाम म्हणजे आयात-निर्यात वर झालेला परिणाम आज विषाणू संक्रमणाच्या भितीमुळे कुठलाही देश आयात आणि निर्यात पूर्णपणे थांबलेली आहे कोणीही धोका पत्करू इच्छित नाही यामुळे सहाजिकच या आयात-निर्यात परिणाम जागतिक उत्पन्नावर झालेला दिसेल कच्च्या मालावर मालावर झालेला दिसेल यामुळे येत्या काळामध्ये उत्पन्नाची प्रक्रिया पूर्णपणे बदललेली असेल याचा परिणाम असा झाला की बेरोजगारी गुंतवणूक व रोजगार आर्थिक संकट या समस्यांना जगाला सामोरे जावे लागेल.

**डब्ल्यू एच ओ कार्यप्रणाली बदल करावा लागेल. :**कोरडा विषाणू संकटाचा सामना करताना डब्ल्यू.एच.ओ. पूर्णतः अपयश आले असेच म्हणावे लागेल ज्याप्रमाणे चीनमध्ये या महामारी चा फायदा होत होता किंवा झाला तेव्हा वेळीच दखल घेऊन जगाला या महामार्गाची जाणीव करून दिली असती तर आज जगाचे चित्र निश्चितच वेगळे असते. ज्या उद्देशा करिता डब्ल्यूएचओ ची निर्मिती करण्यात आलेली आहे तो उद्देश येथे साध्य होताना दिसत नाही आणि म्हणूनच मग अमेरिकेसारखा जो देश जागतिक आरोग्य संघटनेला सर्वात अधिक अर्थ सहकार्य करीत असतो. त्या देशाने सरळ-सरळ शंका या व्यवस्थेच्या कार्यप्रणालीवर घेतलेली दिसते. आणि याचाच परिणाम म्हणून त्यांनी आर्थिक निधी देखील थांबलेला आहे म्हणून भविष्यामध्ये अशा प्रकारचा संकटाचा सामना करताना या व्यवस्थेला आपली कार्यपद्धती मध्ये बदल निश्चितच बदलकरावालागेल.

**आंतरराष्ट्रीय आवागमन कमी होणार** "कोरोनाविषाणूचा परिणाम हा जागतिक आवागमन वर देखील मोठा झालेला दिसतो. आज संपूर्ण आवागमनबंद आहे. अनेक जागतिक विमान कंपन्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे आणि आणखी किती दिवस बंद राहणार याची शाश्वती देता येत नाही यामुळे अनेक वैमानिक स्टाफ बेरोजगारांच्या समस्येतून जात आहे.

असे अनेक परिणाम आज कोरोनाविषाणूचाआजाराने झालेले दिसतात. स्पॅनिश आजाराचेनंतरही जागतिक महामारी म्हणावी लागेल आणि साहजिकच परिणाम देखील तेवढेच जागतिक स्तरावर आज उमटलेले दिसतात.

**निष्कर्ष :**

◦आर्थिक महामंदी येणार
◦ जागतिक व्यापार प्रभावित झालेला आहे.
◦भारताची दशा आणि दिशा जागतिक स्तरावर सुधारणा ची वेळ.
◦ गुंतवणूक दारांना भारतासारख्या देशामध्ये खूप मोठ्या संधी निर्माण होतील.
◦ जागतिक आरोग्य संघटनेला आपली कार्यपद्धतीत बदल करावा लागेल.

**संदर्भ ग्रंथ :**

1.Washingtonpost.com
2.Times of India. indiatimes.com
3.Www.lokmat.com
4.Www.loksatta.com
5.फाडिया डॉ.बी.एल.---- आंतरराष्ट्रीय संबंध, साहित्य भवन पब्लिकेशन.
6.तिवारी रमेश चंद्र ---- आंतरराष्ट्रीय संघटन. विश्व विद्यालय प्रकाशन, वाराणसी.
7.पंत पुशपेश------ 21 वी सदी मे आंतरराष्ट्रीय संबंध.